प्रेसनोट दि.१६/१०/२०१७

**नोकरी लावण्याच्या बहाण्याने फसवणुक करणाऱ्या नायजेरियन यास सायबर क्राईम सेल पुणे शहर यांनी नालासोपारा जि.पालघर येथून केली अटक**

लष्कर येथे रहात असलेला पिडित युवक, वय-२३ वर्षे, शिक्षण -बी.एस.सी.नॉटिकल हा नोकरीच्या शोधात असताना त्याला headrecsection11@gmail.com, hr@pbfenergyusa.com व india-usavisa-apply@asia.com ईमेल आयडी वरुन मेल येऊन PBF Energy Oil and Gas Company, New Jersey, USA कंपनीत एक्झेक्युटीव्ह पदावर जॉब देतो असे अमिष दाखवून गोड बोलून त्याचा विश्वास संपादन करुन त्याला व्हिसा प्रोसेसिंग फि रु.४०,२५०/- भरावी लागेल असे कळविले. सदर रक्कम ही पिडिताने त्यांचे सांगणेनुसार आयसीआयसीआय बँक खातेमध्ये भरली. त्यानंतर परत india-usavisa-apply@asia.com ईमेल आयडीवरुन हेल्थ डिक्लेरेशन ॲप्लीकेशन, एम्लॉयमेंट ॲथोरायझेशन यासाठी भारतीय चलनानुसार रु.१,२९,०००/- रुपये भरावे लागतील असे सांगण्यात आल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांचे सांगणे नुसार रु.१,२९,०००/- स्टेट बँक ऑफ इंडिया खातेमध्ये भरली त्यावेळेस पिडितास त्याला नोकरी लागणार याची खात्री पटली. त्यानंतर पिडिताला त्या व्यक्तीने ईमेल आयडीवर युएसए व्हिसा स्टॅम्प पाठविला, परंतू तो स्टॅम्प पाहिल्यानंतर तो खोटा असल्याचा संशय पिडिताला आल्याने त्याची एकुण रु.१,६९,२५०/- फसवणुक झाली आहे याची खात्री झाल्याने त्याने सायबर क्राईम सेलकडे तक्रार दिली. त्यावरुन लष्कर पोलीस स्टेशन गु.र.नं.२२२/२०१७ भा.दं.वि.क. ४१९,४२०,४०६,३४ आय.टी. ॲक्ट ६६ (सी), ६६(डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर क्राईम सेलकडुन सदर गुन्ह्याचा समांतर तपास करण्यात येत होता. आरोपी यांनी वापरलेल्या मोबाईल नंबरचे विश्लेषन करण्यात आले. आरोपी नागिनदासपाडा, नालासोपारा जि.पालघर येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने राधिका फडके, पोलीस निरीक्षक सायबर क्राईम सेल, यांच्या नेतृत्वाखाली सपोनि स्वप्नाली शिंदे व स्टाफ यांनी नागिनदासपाडा, नालासोपारा, जि.पालघर येथे जाऊन मो.क्र.९९७५५५०९११ बाबत शोध घेतला असता सदरचा मो.क्र. हा Olaitan Aremu Add.Flat No.144, Jakande Estate, Jyana Ipaja, Lajos, Etiki, Nigeria, सध्या रा.ए-२०२, दुसरा मजला, सत्यजित अपार्ट., नागिनदासपाडा, तुळीज, जि.पालघर वापरत असल्याबाबत माहिती मिळाली, त्याअनुषंगाने त्याचेकडे सदर गुन्हयाची चौकशी करता, गुन्हयामध्ये वापर करित असलेले ०२ मोबाईल मिळून आल्याने त्यास शिताफीने पकडुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याचा गुन्हयातला सहभाग निष्पन्न झाला. तसेच त्याचे राहते घरामध्ये ०३ मोबाईल, ०१ डोंगल व ०२ लॅपटॉप मिळून आल्याने ते गुन्हयाचे तपासकामी जप्त करण्यात आले. आरोपी Olaitan Aremu Add.Flat No.144, Jakande Estate, Jyana Ipaja, Lajos, Etiki, Nigeria, सध्या रा.ए-२०२, दुसरा मजला, सत्यजित अपार्ट., नागिनदासपाडा, तुळीज, जि.पालघर याने पिडिताला बाहेरच्या देशामध्ये चांगल्या पगाराची नोकरी देतो असे अमिष दाखवून रु.१,६९,२५०/- रुपये रक्कमेची फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, मा. सपोआ श्री. मिलींद पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. राधिका फडके, सपोनि स्वप्नाली शिंदे-बोराडे, पोउनि नितिन खामगळ, पो.हवा. अस्लम आत्तार, सरिता वेताळ, पो.शि. संतोष जाधव, राजकुमार जाबा, योगेश वावळ, शाहरुख शेख, अमित अवचरे, यांनी केली.

याव्दारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अनेक तरुण मुले-मुली नोकरीसाठी त्यांचे रिझुम ऑनलाईन दाखल करतात, त्यांना अनेक ईमेल वरुन नोकरीबाबत मेल प्राप्त होऊन त्यामध्ये बाहेरच्या देशामध्ये मोठया पगाराची नोकरी देतो असे सांगून आरोपी वेगवेगळया बँक खात्यामध्ये वेगवेगळया कारणास्तव मोठया रक्कमा भरण्यास भाग पाडतात. अशाप्रकारची फसवणुक झाली असल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांच्याशी संपर्क करावा. तसेच नोकरीबाबत शक्यतो मान्यताप्राप्त संस्था यांच्या कार्यालयात जावुनच आर्थिक व्यवहार करावेत.